अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र.ई/ १५४१
दिनांक : २१।७।१८

## कार्यालयीन आदेश

**विषय : सालाबादप्रमाणे पुणे शहरात आगमन होणाऱ्या श्री संत तुकाराम महाराज व श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मार्ग व मुक्कामाचे परिसरातील रस्त्यांवरील अतिक्रमणे निर्मुलनाबाबत.**

श्री संत तुकाराम महाराज पालखीचे व श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दि.०७/०७/२०१८ रोजी पुणे शहरात आगमन होणार असून दि.०७/०७/२०१८ व दि.०८/०७/२०१८ दोन दिवस त्यांचा मुक्काम निवडुंग्या विठोबा मंदीर, नाना पेठ व पालखी विठोबा मंदीर, भवानी पेठ या ठिकाणी राहणार आहे. दोन्ही पालख्यांचे दि.०९/०७/२०१८ रोजी सकाळी ६.०० वाजता मुक्कामाचे ठिकाणावरुन हडपसरकडे प्रस्थान होणार आहे.

त्याअनुषंगाने पुणे शहरातील सर्व पालखी मार्गावरील रस्ता/पदपथांवरील व पालखी मुक्कामाच्या ठिकाणच्या सार्वजनिक जागेवर कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत खादयपदार्थाचे स्टॉल, स्वागत कक्षांचे मांडव/स्टेज, तसेच स्वागत कमानी इत्यादींना मा. पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर व मा. पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१, पुणे शहर यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिल्याशिवाय संबंधित क्षेत्रिय कार्यालयांकडून परवानगी देण्यात येवू नयेत. तसेच पालखी मार्ग व मुक्काम परिसरातील **संबंधित क्षेत्रिय कार्यालयांकडील अतिक्रमण निर्मुलन पथकांनी दि.०४/०७/२०१८ ते दि.०९/०७/२०१८ या कालावधीत त्यांच्या हद्दीतील रस्ता/पदपथांवरिल सर्व प्रकारची अतिक्रमणे, झोपड्या व इतर अडगळीच्या वस्तू उदा. भंगार वाहने, खादयपदार्थ विक्रेत्यांची अतिक्रमणे यांचेवर त्वरित कारवाया करून अशी अतिक्रमणे हटविण्यात येवून पुणे शहरात पालख्यांचे आगमन होण्यापूर्वी शहरातील सर्व पालखी मार्ग/मुक्कामाची ठिकाणे अतिक्रमणमुक्त राहतील, अशी दक्षता सर्व संबंधित क्षेत्रिय कार्यालयांनी घ्यावी.**

पुणे येथील मुक्कामाचे ठिकाणावरुन दि.०९/०७/२०१८ रोजी सकाळी ६.०० वाजता श्री. संत तुकाराम महाराज पालखी लोणी काळभोरकडे व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सासवड रोडने पंढरपूरकडे रवाना असून या अनुषंगाने पालखी मुक्काम परिसरातील व पालखी मार्गस्थ होण्याच्या रस्त्यांवरिल वारकऱ्यांचे रहदारीस अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटविणेकरिता खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधित अतिक्रमण निर्मुलन पथके व सर्व संबंधित कनिष्ठ अभियंता/क्षेत्रिय अतिक्रमण निरिक्षक/अतिक्रमण निरिक्षक/सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक यांनी कामकाजाचे नियोजन करुन कारवाया करण्यात येवून भाविकांना व वारकऱ्यांना रहदारीसाठी कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही, याबाबत खबरदारी घेण्यात यावी.

| **गट क्र.** | **कारवाई दिनांक/कालावधी व कारवाईसाठी जमण्याचे ठिकाण** | **कारवाई ठिकाण** | **अतिक्रमण निर्मुलन पथके व त्यांचेवर नियंत्रण करणारे क्षेत्रिय अतिक्रमण निरिक्षक/अतिक्रमण निरिक्षक/ सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक** | **मनपा पोलीस अधिकारी व कर्मचारी** |
|---|---|---|---|---|
| गट क्र. १ | दि.०४/०७/२०१८ ते दि.०७/०७/२०१८ दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत. परिमंडळ निहाय स्वतंत्र २ पथकाद्वारे (जमण्याचे ठिकाण संबंधित परिमंडळ कार्यालय) | पुणे शहरात पालख्यांचे आगमन होणारे सर्व पालखी मार्ग/लगतचे रस्ते यांचेवरील रहदारीस अडथळा ठरणारी सर्व प्रकारची अतिक्रमणे हटविणे. | मा. उप आयुक्त,परिमंडळ क्र. १ व २ चे क्षेत्रामधील सर्व महा.सहा.आयुक्त कार्यालयांकडील नेमणूकीस असलेली अतिक्रमण निर्मुलन पथके/बहुउद्देशीय पथके यांचेमार्फत सर्व संबंधित कनिष्ठ अभियंता/क्षेत्रिय अतिक्रमण निरिक्षक/ अतिक्रमण निरिक्षक/सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक यांनी त्यांचे मा. उप आयुक्त (परिमंडळ कार्यालय) व महा.सहा.आयुक्त यांचे नियंत्रणाखाली कामकाज करावयाचे आहे. | १+१० प्रत्येक पथकास |

Scanned by CamScanner

| गट क्र. | कारवाई दिनांक/कालावधी व कारवाईसाठी जमण्याचे ठिकाण | कारवाई ठिकाण | अतिक्रमण निर्मुलन पथके व त्यांचेवर नियंत्रण करणारे क्षेत्रिय अतिक्रमण निरिक्षक/अतिक्रमण निरिक्षक/ सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक | मनपा पोलीस अधिकारी व कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| गट क्र. २ | दि.०५/०७/२०१८ ते दि.०९/०७/२०१८ परिमंडळ निहाय स्वतंत्र २ पथकाद्वारे दोन पाळ्यांमध्ये (जमण्याचे ठिकाण संबंधित परिमंडळ कार्यालय) | पालखी मुक्कामाचे ठिकाण व परिसरातील सर्व रहदारी असणारे रस्ते/पदपथ तसेच पालखी प्रस्थान मार्गावरील हडपसर परिसरातील सोलापूर रस्ता व सासवड रस्ता मनपा हद्दीपर्यंत | मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ व ५ चे क्षेत्रामधील सर्व महा.सहा.आयुक्त कार्यालयांकडील नेमणूकीस असलेली अतिक्रमण निर्मुलन पथके/बहुउद्देशीय पथके यांचेमार्फत सर्व संबंधित कनिष्ठ अभियंता/क्षेत्रिय अतिक्रमण निरिक्षक/ अतिक्रमण निरिक्षक/सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक यांनी त्यांचे मा. उप आयुक्त (परिमंडळ कार्यालय) व महा.सहा.आयुक्त यांचे नियंत्रणाखाली कामकाज करावयाचे आहे. | १+१० प्रत्येक पथकास |

वरिल नियोजनानुसार दि.०४/०७/२०१८ ते दि.०९/०७/२०१८ रोजी पर्यंत वरील पथकांनी कामकाज करावयाचे आहे, तसेच दि.०९/०७/२०१८ रोजी महा.सहा.आयुक्त, हडपसर क्षेत्रिय कार्यालय यांचे मार्गदर्शनानुसार गट क्र.२ चे पथकांनी कार्यवाहीबाबत पुर्वनियोजन करावयाचे आहे. वरिल दिलेल्या तक्त्यानुसार कार्यवाही करणेकामी संबंधित महा.सहा.आयुक्त यांना त्यांचे स्थानिक पातळीवरील परिस्थितीनुसार वरील कार्यवाही नियोजनामध्ये काही बदल करावयाचे असल्यास, त्यांचेकडील नियोजनानुसार त्यांनी आवश्यक ते बदल करून कारवाई नियोजन करणेस हरकत नाही.

पालखी मुक्कामाचे ठिकाणी रस्त्यांवरिल भाविकांच्या रांगा/गर्दी नियंत्रणाकरिता सुरक्षा रक्षक नेमणे, तसेच आवश्यक त्या ठिकाणच्या गर्दीचे नियंत्रण करणे इत्यादी याकामी मा. मुख्य सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, पुणे महानगरपालिका यांचेशी संबंधित महा.सहा.आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार समन्वय साधून कार्यवाही करावी.

**टीप** :- अतिक्रमण निर्मुलन पथकांमधील सर्व बिगारी/मोकादम/मोटार सारथी इ. मनपा सेवकांनी वरिल कारवाईचेवेळी मनपाने ठरवून दिलेल्या ड्रेसकोडमध्ये ओळखपत्रासह कारवाईकरता हजर राहणे आवश्यक आहे. याबाबी पूर्ण न करणा-या सेवकांची गैरहजेरी लावण्यात येईल. याबाबत संबंधित सेवकांना त्यांचे मोकादम व संबंधित सहाय्यक अतिक्रमण निरिक्षक/अतिक्रमण निरिक्षक यांनी पूर्वसूचना देण्यात यावी.

कळावे.

(माधव जगताप)
उप आयुक्त
(अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका.

<u>प्रत :-</u>

१) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
पुणे महानगरपालिका.
२) मा. पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर.
३) मा. पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१, पुणे शहर.
यांजकडेस माहितीस्तव सादर...

१) मा. सह महापालिका आयुक्त/मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. १ ते ५
२) मा. महापालिका सहाय्यक आयुक्त, सर्व क्षेत्रिय कार्यालये
यांजकडेस, योग्य त्या कार्यवाही व नियंत्रणासाठी सादर...
३) मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक, अतिक्रमण विभाग, पुणे महानगरपालिका
यांजकडेस, उपरोक्त कारवाईसाठी दिलेल्या नियोजनानुसार प्रत्येक गटास पोलीस अधिकाऱ्यांसह आवश्यक तो पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

Scanned by CamScanner